# परीक्षा कामांत कुचराई करणाऱ्या प्राध्यापकांवर दंडात्मक कारवाईचे निर्देश

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

वार्ताहर, यवतमाळ

विद्यापीठ परीक्षेत सहकार्य न करणाऱ्या, निष्काळजीपणा करणाऱ्या आणि परीक्षेचे काम नाकारणाऱ्या प्राध्यापकांवर शिस्तभंगाची कठोर कारवाई करून शिक्षा करण्याबाबतचे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने केलेले नियम सध्या जोरदार चर्चेचा विषय झाला असून कामचुकार प्राध्यापकांमध्ये चांगलीच धडकी भरली आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या ३२ व्या कलमाचा आधार घेत विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाने हे कठोर नियम केले असून कुलगुरू डॉ. मोहन खेडकर यांनी 'निर्देश' काढून ते नुकतेच लागू केले.

परीक्षेची प्रश्नपत्रिका काढताना चुका केल्यास, प्रश्नांची पुनरावृत्ती झाल्यास, अभ्यासक्रमाबाहेरचे प्रश्न विचारल्यास, पीएच.डी.च्या मार्गदर्शकांनी निष्काळजीपणा दाखवल्यास, परीक्षा कामांच्या आदेशाची अवहेलना केल्यास, पर्यवेक्षणाच्या कामात हयगय करून कॉपी पुरवण्यास मदत केल्यास किंवा कॉपी प्रकरणे दाबून ठेवल्यास, उत्तरपत्रिका तपासतांना निष्काळजीपणा केल्यास, धावत्या पथकाने परीक्षा केंद्रांना भेटी न दिल्यास संबंधित प्राध्यापकाला पाच हजार रुपये दंडाची तरतूद या निर्देशात करण्यात आली आहे. याशिवाय प्रश्नपत्रिका फोडण्यात पेपर काढणाराच सहभागी आढळल्यास किंवा परीक्षा सुरू होण्यापूर्वी परीक्षा केंद्रावर पेपर फुटल्यास संबंधित प्राध्यापकाला दहा हजार रुपये, संशोधन कार्यात संपूर्ण वाङ्मय चोर्य करणाऱ्यास दहा हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात येणार आहे. उत्तरच देता येणार नाही, असे प्रश्न प्रश्नपत्रिकेत विचारणे, प्राचार्यांनी योग्य कारण न देता प्राध्यापकांना परीक्षा कामासाठी रिलिव्ह न करणे विद्यापीठ कामात प्राचार्यांचा असहकार, एका विद्यार्थ्याचे गुण दुसऱ्या विद्यार्थ्याला देणे, इत्यादी कारणांसाठी प्राचार्य आणि प्राध्यापकांना शंभर रुपयांपासून दोन हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद या निर्देशात करण्यात आली आहे.

प्राध्यापकांना पूर्ण पगार नव्हते, कमी पगारदेखील सहा सहा महिने होत नव्हते, पदांची सुरक्षितता नव्हती त्या काळात प्राध्यापक परीक्षा कामाचे वेगळे पैसे मिळतात म्हणून कामासाठी आटापिटा करत आता मात्र सहाव्या वेतन आयोगाने चित्र बदलून टाकले आहे, प्राध्यापकांना सेवेची सुरक्षितता प्राप्त झाली आहे. पगार गलेलठ्ठ आहे. त्यामुळे अनेक प्राध्यापक विद्यापीठ परीक्षा कामात सहकार्य करीत नाही. परीक्षांचे निकाल वेळेवर लागत नाहीत. विद्यार्थ्यांचे त्यामुळे नुकसान होते. या सर्व बाबी लक्षात घेऊन विद्यार्थी हितासाठी विद्यापीठाने दंडाची तरतूद करणारा निर्देश जारी केल्याची चर्चा आहे.

### सेवा पुस्तकातही नोंद

प्राचार्य-प्राध्यापकांना परीक्षा कामात कुचराई केल्याबद्दल दंड झाल्यास त्यांची नोंद संबधितांच्या सेवा पुस्तकात करण्यात यावी, अशी तरतूदही करण्यात आली असून हा मुद्दा चर्चेचा विषय झाला आहे. सेवापुस्तक म्हणजे शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांचा आत्माच असतो. त्या पुस्तकात नोंद झाल्याशिवाय प्राध्यापक या निर्देशांना गांभीर्याने घेणार नाहीत असे परीक्षा मंडळाचे मत झाले असावे. हा निर्देश सध्या उलट सुलट चर्चेचा विषय आहे. या निर्देशाचा गैरफायदा घेऊन प्राध्यापकांचा छळ होऊ शकतो, अशी भीती देखील व्यक्त होत असतानाच अशा तरतूदीची गरज असल्याचे मत अनेक प्रामाणिक पणे काम करणारे प्राध्यापक व्यक्त करीत आहेत. २०१५च्या हिवाळी परीक्षापासून हा निर्देश लागू करण्यात आला आहे.

### लोक विद्यापीठ कायदा झाला तर ...

नवा लोक विद्यापीठ कायदा विधिमंडळाच्या येत्या हिवाळी अधिवेशनात मंजूर होण्याची शक्यता उच्च शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी व्यक्त केली असताना केवळ एक दोन महिन्यासाठी प्राध्यापकांवर दंडात्मक कारवाई करणारा निर्णय विद्यापीठाने घेऊन काय साधले हाही चर्चेचा विषय आहे. कारण या दंडात्मक तरतुदी विद्यमान महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यांतर्गत केलेल्या आहेत. नवा लोकपीठ विद्यापीठ कायदा अंमलात आल्यास या तरतुदी आपोपच रद्द होतील. कदाचित या शक्यतेमुळेच प्राध्यापकांच्या तीव्र प्रतिक्रिया खुलेआम व्यक्त झाल्या नाहीत, असे चित्र आहे.

लोकसत्ता दि. ०३/१२/१५